# <u>प्रेसनोट</u>

दि.१८/११/२०२२

## येरवडा खुले कारागृहातील कारागृह हवालदारावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | येरवडा पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम — ७, ७ अ, १२ |
| तक्रारदार | पुरूष, वय - ३० वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | १. लोकसेवक - बाजीराव ज्योतीबा पाटील, वय - ५४ वर्षे, पद — कारागृह हवालदार,खुले कारागृह,येरवडा, पुणे.<br>२. रिहाना आसिफ सय्यद, वय - ४८ वर्षे, ( कारागृह आवारातील कॅन्टीनमधील महिला कर्मचारी - खाजगी ) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | सुरूवातीस ५०,०००/- तडजोडीअंती ३५,०००/- |
| स्वीकारलेली लाच रक्कम | १५,०००/- ( पंधरा हजार रूपये) |

पडताळणी व सापळा दिनांक :- दि. १८/११/२०२२
सापळा ठिकाण :- खुल्या कारागृहाच्या आवारातील कॅन्टीनमध्ये

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे येरवडा खुले कारागृह येथे शिक्षा भोगत असून सध्या ते संचित रजेवर आहेत. त्याच्या रजेच्या कालावधीमध्ये त्यास बोलावून यातील लोकसेवक कारागृह हवालदार - बाजीराव पाटील याने तक्रारदार याची रजा संपण्यापुर्वी जर त्याने ५०,०००/- रूपये दिले नाहीत तर त्याच्या गैरवर्तणूकीचा अहवाल पाठवून त्यास खुल्या कारागृहातून मध्यवर्ती कारागृहात पाठवीले जाईल असे सांगून तक्रारदाराकडे ५०,०००/- रूपये लाचेची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता लोकसेवक - कारागृह हवालदार बाजीराव पाटील याने तक्रारदार याचेकडे मागणी केलेल्या ५०,०००/- रूपये लाच रक्कमेपैकी १५,०००/- लाच रक्कम रिहाना सय्यद हिने स्वीकारल्यावर त्या दोघांना ताब्यात घेण्यात आले असून वरिलप्रमाणे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटच्या पोलीस उप अधीक्षक शितल घोगरे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

३. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
४. अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
५. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
६. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
७. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
८. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभागं पुणे.